PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 3

# मराठा नगर नियोजन

**डॉ. पराग गोवर्धन नारखेडे**
विभाग प्रमुख,
वास्तुविद्या महाविद्यालय, पुणे
**महाराष्ट्र भारत**

**शर्वरी देशपांडे**
अंतीम वर्ष विद्यार्थिनी ,
वास्तुविद्या महाविद्यालय, पुणे
**महाराष्ट्र भारत**

**संक्षेप :**

प्रस्तुत निबंधामध्ये मराठा शासनाच्या कार्यकाळात घडवून आणलेल्या नगर नियोजनाच्या पध्दतींचा सर्वसमावेशक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात १७व्या व १८व्या शतकात मराठा सरदारांनी नगर विकासासाठी अनेक योजना राबविल्या. राजकीय व्यवस्थेसाठी एखाद्या गावाचे परिवर्तन शहरात करणे, किंवा शहराचे परिवर्तन जिल्ह्यात करणे अनिवार्य झाले होते. प्रशासकीय कारणांसाठी केले जाणारे हे बदल केवळ सरदारांच्या सोयीचे नव्हते, तर नगरात राहणाऱ्या नागरिकांच्या सुविधा जपणारे होते. राजकीय व्यवस्थेसाठी अनुकूलता व औद्योगिक संधींमध्ये वाढ हे नगरांच्या विस्तार करण्यामागचे मुख्य उद्देश्य होते. परिणामी उद्योगांमध्ये संधी वाढल्याने नगरातील निवासी वस्त्यांमध्ये देखील वाढ होताना दिसून आली. वाढलेल्या नागरी वस्त्यांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांच्या जीवनशैली मधील सुधारणांसाठी परिणामी नगर विकास होऊ लागला. मराठा काळातील उपलब्ध झालेल्या नकाशांचा अभ्यास (अध्ययन) करून या गाव व शहरांच्या विकास पद्धती आणि कालक्रमानुसार परिवर्तनाचा तक्ता समजून घेतला गेला आहे. सतराव्या शतकात नगर नियोजनाच्या प्राथमिक टप्प्यामध्ये सुरक्षा व औद्योगिक संधींमध्ये वाढ होणे आवश्यक धरले जात होते, तर अठराव्या शतकात विकसित नगरांमध्ये सर्वसामान्य सुविधांची तरतूद (पाणी पुरवठा, इ.) करणे गरजेचे ठरत होते. सामाजिक उपक्रमाच्या कार्यासाठी उपयुक्त वातावरण निर्माण करणे, आणि त्याच बरोबर उदयोन्मुख शहरांना प्रशासकीय दर्जाच्या सुविधा देणे शक्य झाले. आजकालच्या नगर विकास योजनाकर्त्यांच्या दृष्टीने या पुरोगामी पद्धतींचा अभ्यास उपस्थित अडचणींना सामोरी जाण्याकरिता महत्त्वाचा ठरू शकतो. अशाच पद्धतीने, मराठा काळातील नगराच्या सर्वसमावेशक प्रगमनशील नियोजनाचा आढावा घेणारा हा संशोधनशील निबंध सद्यपरिस्थिती मधील प्रश्न सोडवण्यास उपयोगी ठरतील अशा योजनांचे संकलन करण्यास मदत करतो.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 3

**प्रस्तावना :**

सद्य परिस्तिथी व भविष्यातील आव्हानांना सामोरं जाण्याची साधने आपणास इतिहासातील उदाहरणांचा सराव करूनच मिळू शकतात. अनेक लेखकांनी एकत्र केलेल्या दस्तऐवज्यांमुळे ही साधने प्राप्त करणे सोपे झाले आहे. मराठा सरदारांनी वेगवेगळ्या प्रांतांमधील विकासाचे सामर्थ्य विचारात घेऊन, त्या प्रांतात नक्की कोणत्या संध्या उपलब्ध करून द्यायच्या हे ठरविले. सर्व प्रकारचे तोटे लक्षात घेता, नगरात राहणाऱ्या लोकांच्या दृष्टीने सालस असा उपाय शोधण्यास मदत केली. सोळाव्या शतकात मुघल साम्राज्यात भारतातील बऱ्याच गावांत व नगरांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने बदल करण्यात आले. प्रशासकीय नगरांच्या बाह्य सीमारेषांवर उंच भिंती बांधण्यात आल्या. परंतु सतराव्या शतकात जेव्हा हीच नगरे मराठा राज्यात दाखील झाली, तेव्हा नागरवासियांच्या गरजांना प्राधान्य देणारा नगर विकास प्रत्यक्षात आमलात आणला गेला.

प्रारंभी काळात सर्वाधिक नगरे नदीकाठी वसल्यामुळे पाणी, अन्न व कपडा अशा नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत होत्या. एक सुखी जीवन जगण्यासाठी जी काही साधने लागतात ती त्यांना आपापल्या नगरातच उपलब्ध होती. त्यामुळे केवळ आठवडा बाजारात उपलब्ध होणाऱ्या अशा किमान वस्तूंसाठी इतर नगरांवर अवलंबून राहावे लागत असे.

काळानुसार व्यवसायामध्ये वाढ झाली, आणि अनेक नगरांच्या सीमारेषेजवळ आठवडा बाजाराच्या बरोबरीने बाजारपेठांसाठी जागा नियुक्त करण्यात आल्या. आठवडा बाजारामध्ये नगरातील व्यापारी माल विकला जायचा, तर बाजारपेठेत साधारण जवळपासच्या विभागातील सर्व गाव व नगरांमधील व्यापारी विक्री उद्योग करण्यास दाखल व्हायचे. जसा व्यापार वाढत गेला, तसा नगरांचा विकास वाढत गेला. व्यापारामुळे नागरी वस्त्यांच्या विस्तारामध्ये सुद्धा वाढ होत राहिली. अशाच प्रकारे गावांचे नगरांमध्ये आणि नगरांचे शहरांमध्ये परिवर्तन झाले.

**प्रारंभिक नगर नियोजन योजना :**

सतराव्या शतकामध्ये नगरांच्या विस्ताराप्रमाणे दर्जा नमूद करण्यात केला जात असे. वाडी, मजरा, मौजा, कसबा आणि शहर अशा पाच प्रकारची नगरे अस्तित्वात होती, ज्यात वाडी ही उपमा सर्वात किमान विस्तार असलेल्या नगराला दिली जायची, तर सर्वात विशाल विस्तार असलेल्या विभागाला शहर हे नाव दिले होते.





**नगरांच्या बदलत्या दर्जाचे टप्पे**


प्रशासकीय सोयीप्रमाणे आणि व्यापारातील वाढ पाहता नगरांचे विलीनीकरण करण्यात आले. सामूहिक एकत्रीकरणाच्या २ पद्धती होत्या - केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण.

कोणत्याही दोन नगरांच्या केंद्रीकरणाचे ३ मार्ग होते -


१) मौजाच्या आणि त्याच्या आसपासच्या वाडी व मजरा यांचे एकत्रीकरण करून एकाच विशाल मौजा तयार करणे





२) मौजा आणि त्याच्या आसपासच्या वाडी गावांचे एकत्रीकरण करून मौजा तयार करणे




३) वाडी आणि मजरा यांचे एकत्रीकरण करून मौजा ला आहे तसे ठेवणे



विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेमध्ये नगराच्या बाहेर बाजारपेठेसाठी जागा नियुक्त केली जात असे. बाजारपेठेमुळे नगरातील व्यापारांना अतिरिक्त उद्योग करण्याची संधी मिळाली, जवळपासच्या गावातील लोकांसाठीही खरेदी-विक्रीसाठी सुसंध्या तयार झाल्या, व त्याचबरोबर बाजारपेठ नगराच्या हद्दीबाहेर असल्यामुळे नगरातील दैनंदिन जीवनामध्ये अडथळाही येण्याची शक्यता कमी झाली.





**विविध नगरांची वैशिष्ट्ये व त्यांमध्ये होणारे बदल :**

सोळाव्या शतकामध्ये बऱ्याचश्या मजरा व वाडी गावांचा दर्जा अपरिवर्तित राहिला, म्हणूनच नगरांच्या विलीनीकरणाची प्रमाण कमी होते. नगरांची तटबंदी करण्यात आली असून कोटही बांधण्यात आले.

सतराव्या शतकामध्ये मजरा, मौजा किंवा कसबा अशा कोणत्याही विशिष्ट दर्जाचा विचार ना करता अनेक नगरांबाहेर बाजारपेठेसाठी जागा नमूद करण्यात आली. मौजा असा दर्जा असलेल्या नगरात एक मुख्य रास्ता, तर त्या रस्त्यामधून मूळ असलेले काही सहाय्यी रस्ते (फाटे) असत. अशा मौजांमध्ये रस्त्यांसोबतच वसाहतींमध्ये देखील भर पडल्यांमुळे पुढच्या काही काळासाठी रेषात्मक रीतीने विकास होत राहिला, आणि मोठ्या मौजांचा निर्माण होत गेला. एक मुख्य रास्ता, दोन किंवा तीन सहायक रस्ते व अनेक गृहनिर्माणाच्या वसाहती असलेल्या नगराला छोटा कसबा म्हणले जात असत.

अठराव्या शतकामध्ये काही गावांचे केंद्रीकरण करण्यात आले. अनेक कसबे आणि मौजे 'जहागीर' च्या स्वरूपात मराठा सरदारांना सोपविण्यात आले. याच कारणामुळे बऱ्याच नगरांची प्रगती होताना दिसली. अनेक मौजांच्या बाहेर तटबंदी करण्यात आली. बाजारपेठांच्या संख्येपेक्षा वसाहतींच्या वाढलेल्या संख्येमुळे नगरांची प्रगती प्रमाणित होऊ लागली. अठराव्या शतकाच्या शेवटी पुणे हा कसबा शहरात परिवर्तित होताना दिसून आला, आणि त्याचमुळे इतर नगरातील सुधारणांसाठी उदाहरणात्मक नजरेने पुण्याला पहिले जाऊ लागले.




**मराठा नगरातील नियोजन पद्धती :**

**१) रस्त्यांच्या नियोजन पद्धती :**

नगराच्या सुरक्षेचा विचार करूनच रस्त्यांचे नियोजन केले जायचे. सोळाव्या व सतराव्या शतकाआधी असलेल्या रस्त्यांच्या संरेखनात फारसा बदल ना करता, जिथे गरज होती, केवळ तिथे रस्त्यांची रुंदी वाढवण्यात आली.


**मुख्य / नगर ते नगर जाणारे रस्ते -**

अनेक नगरांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याचे दोन प्रकार होते - एक होता उभा मार्ग, तर दुसरा होता आड मार्ग. उभा मार्ग कसब्याच्या दिशेला जात असत, तर आड मार्ग अनेक मौजांच्या मध्यातून जाऊन त्यांना जोडत असत. नगराच्या सुरक्षिततेसाठी आणि लष्करी मोहीम व शत्रूच्या सैन्याला लांब ठेवण्यासाठी प्रवेश मार्ग मुख्य रस्त्याहोऊन दूर जाणाऱ्या दिशेने नियोजला जात असत. मुख्य रस्त्याच्या सीमेवरच बाजारपेठांना जागा दिल्यामुळे आसपासच्या नगरांना पेठेत प्रवेशही करणे सोपे झाले. त्याचबरोबर वास्तविक नगरमध्ये प्रवेश करण्याची गरज देखील भासत नाही. बाजारपेठांना जोडणारे रस्ते सहसा वापरण्याजोगे व सरळ रितीने बांधले गेले होते, आणि मुख्य रस्त्याला जोडलेले सर्व चौक व रस्ते सुद्धा उजव्या कोनाच्या आकृतीत बसवण्यात आले होते.

**नगरातील अंतर्गत रस्ते -**

मराठा नगरांमध्ये सामान्यतः नागमोडी मार्ग अस्तित्वात होते, परंतु ही पद्धत उत्तर भारतातील सरळ रस्त्यांच्या पद्धतीपेक्षा विरुद्ध ठरते. उत्तर भारतामध्ये जमिनीचा भूभाग सरळ असल्यामुळे रस्तेही सरळ योजिले जाऊ शकतात, मात्र मराठा नगरांमध्ये पश्चिमी घाटांच्या अनियमित स्थलांतरामुळे सरळ रस्त्यांचे नियोजन करणे अवघड होते. या अनियमित स्थलांतरानुसार वक्ररेषांना नेमून नागमोडी किंवा वेडेवाकडे रस्ते योजिले गेले. नगराच्या अंतर्गत बैलगाडी व चालणे हीच वाहतुकीची साधने होती, त्यामुळे सर्व रस्त्यांची रुंदी किमान ठेवली जात असत. किमान रुंदी व रस्त्यांचे नागमोडी नियोजन या दोन पैलूंमुळे नगराची सुरक्षितता जपली जात असत. शत्रूच्या सैनिकांना रस्त्याच्या एका कड्यावरून दुसरे कडे दिसणे वेड्या-वाकड्या वळणांमुळे अशक्य होते, तेच स्थानिक सर्व रस्त्यांशी परिचित असत. किमान रुंदीमुळे एकाच वेळी अनेक सैनिकांना एकाच ठिकाणी जमून हल्ला करणेही शक्य नव्हते. अंतर्गत मुख्य रस्ते मध्यवर्ती मुख्य रस्त्यांच्याच रेषेनुसार आखले गेले होते, तर सहाय्यक रस्ते अंतर्गत रस्त्यांना वक्ररेषांनी जोडले गेले होते.

प्राचीन काळातील मोजमापाच्या प्रमाणांचा सद्यकाळातील मेट्रिक प्रणालींशी तुलना केल्यावर काही रस्त्यांची रुंदी मोजली जाऊ शकते. वेगवेगळ्या प्रकारांच्या रस्त्यांची रुंदी खालील प्रमाणे आहे :




मुख्य व दुय्यम रस्त्यांभोवती वसलेली नगरे दाखवणारा काल्पनिक नकाशा


- **सहाय्यक रस्ता** : १.८ मीटर ते २.५ मीटर रुंद
- **अंतर्गत मुख्य रस्ता** : ३.१५ मीटर ते ४.५ मीटर रुंद
- **बाजारपेठ / मध्यवर्ती मुख्य रस्ता** : ७.५ मीटर ते १० मीटर रुंद

**२) तटबंदी आणि नगराचा सुरक्षा दरवाजा :**


व्यावसायिक व लष्करी दृष्टीने महत्त्व असलेल्या नगरांना तटबंदी केली जात असत. शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी काही सरदारांनी जहागीरीभोवती कोट, तर काही राज्यकर्त्यांनी गाधी बांधण्याची तरतूद केली. सैनिक ठाण्याला 'गाधी', तर तटबंदी ला 'कोट' असे म्हणत असत. काही नगरांभोवती कोट, काही नगरांसाठी गांधी, तर काही नगरांमध्ये दोन्ही संरक्षणात्मक सुविधांसाठी प्रयोजन केले गेले होतं. नगरांच्या नकाशात कमीत कमी बदल करत मौजा आणि कसब्यासाठी प्रवेशद्वार बांधण्यात आले. नगरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाजारपेठांना तटबंधीत क्षेत्राबाहेर ठेवले जात असत. प्रवेशद्वारांचे नाव द्वाराजवळील पाणवठा, नगर किंवा बाजारपेठेवरून ओळखले जात असत.

मौजामध्ये एक प्रवेशद्वार मुख्य रस्त्याच्या दिशेने बांधले जायचे, आणि दुसरे प्रवेशद्वार नगराच्या पाणवठ्याच्या दिशेने उघडेल असे बांधले जायचे. दुसऱ्या प्रवेशद्वाराचा उपयोग सामान्यतः स्थानिकांकडूनच केला जात असत. कसबा गावाचा विस्तार मौजापेक्षा मोठा असल्याने कसब्यासाठी अनेक प्रवेशद्वाराची तरतूद केली जात असत,व पाणवठ्याकडे जाणारे देखील द्वार बांधले जात असत.


चाकण जवळील कोट संग्रामदुर्ग - सध्या पुण्याहोऊन ४० किमी वर स्थित पुणे-नाशिक रस्त्यावर वसलेले




पुण्याच्या नकाशाची रेषाकृती




**३) मंदिरांचे महत्त्व :**




नगर नियोजनाचा उगम मंदिरांच्या स्थापनेतून गिरवला जाऊ शकतो. मंदिरे केवळ पूजा-आराधनेचे ठिकाण नसून नागरिकांसाठी सार्वजनिक संमेलनांची जागा म्हणूनही उपयुक्त ठरली. अशाच सर्व मंदिरांच्या ठिकाणावरून नगराचे उगम स्थान, आणि उत्तरोत्तर होत गेलेला विस्तार आखता येतो. गावातील बऱ्याच रस्त्यांच्या सुरुवातीला छोटी देऊळ, तर गावातील मध्यबिंदू भागात मोठी मंदिरे अनेक नगरांच्या निरीक्षणात आढळून आली. बहुतेक ठिकाणी नगराच्या प्रवेशद्वारी गणपतीचे देऊळ, सीमारेषेजवळ मारुती मंदिर तर रस्त्याच्या सुरुवातीला व बंगल्याच्या समोरील दिशेस म्हसोबा मंदिर स्थापिले जात असत. मध्यबिंदू असणाऱ्या मंदिरांच्या भोवतीचे परिसर उद्यानाच्या रूपात विकसित केले जात असत व या उद्यानामध्ये सार्वजनिक जत्रा आणि उत्सव साजरे केले जात असत. पुण्यातील सारसबाग हे उद्यान याच पद्धतीचे उदाहरण समजले जाते, जिथे गणपती मंदिराभोवती पाण्याचे तलाव व बागेचे नियोजन केले गेले. अशाच प्रकारे मंदिरांमुळे वसाहतींचा विस्तार निश्चित केले जाऊ शकतो.

**४) नगरातील सार्वजनिक सुविधा :**

**पाणी पुरवठा -**

सर्वाधिक नगरांचा निवास पाण्याच्या स्रोताजवळ असल्यामुळे पाण्याची मूलभूत गरज ही नजीकच्या नदी, तलाव किंवा पाणवठ्याच्या साहाय्याने पूर्ण होत असत. नदीकाठांवर पाण्यापर्यंत पोहोचण्यासाठी घाट बांधले गेले. सतराव्या शतकाच्या मध्य काळापर्यंत नागरिक नदीकाठावर वैयक्तिकरित्या जाऊन पाणी गोळा करत असत. काही सरदारांच्या वाड्यात व वसाहतींमध्ये पाण्याचा जमाव करण्याकरता विहीर खणली जात असत. वसाहतींच्या संख्येत वाढ नोंदवल्यामुळे सामूहिक पुरवठ्यासाठी पाण्याच्या टाक्यांची गरज अठराव्या शतकाच्या शेवटी जाणवत गेली, आणि त्यामुळे शहर व मोठ्या कसब्यांमध्ये पुरवठ्याचे नियोजन होत गेले. काही नगरांमध्ये इस्लामिक राजवटीत बांधलेल्या जलचरांच्या वापर करून पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली. वाढत्या वसाहतींच्या गरजा पूर्ण करण्याकरता पेशवा बाळाजी बाजीराव यांनी पुण्यात ५ तलाव व २२ हौद बांधले.

**स्वच्छताविषयक सेवा व सांडपाणी विल्हेवाट –**

स्वच्छताविषयक सेवांमध्ये सांडपाणी विल्हेवाटीसाठी पाण्याचे पाट किंवा उघडे खंदक खणले जायचे. कचरा घरोघरी जाऊन गोळा केला जात असत व एकत्र प्रकारे विल्हेवाट लावली जात असत. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्यातील काही पेठांमध्ये स्वच्छतेच्या दृष्टीने अरुंद रस्त्यांचे नियोजन करण्यात आले. मुख्य रस्त्यापासून समांतर असलेले हे अरुंद रस्ते बहुतेक दुकान किंवा घरांच्या स्वच्छतागृहाबाहेर योजिले गेले, ज्यामुळे कचरा गोळा करणे व सांडपाणी विल्हेवाट लावणे सोपे झाले. या कल्पनेमुळे मुख्य रस्त्यांची रहदार अबाधित राहिली.

**सार्वजनिक संमेलनाच्या जागा –**

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत बाजारपेठा, आठवडा बाजार आणि मंदिरे सार्वजनिक संमेलनाच्या जागा होत्या. शतकाच्या उत्तरार्धामध्ये मंदिरांभोवती उद्यान व बागांचा विस्तार वाढत गेला. सण-समारंभाचे कार्यक्रम मंदिराच्या परिसरात आयोजित केले जात असत. उत्सव आणि जत्रासुद्धा नगरातील चौकातल्या मोकळ्या जागेत साजरे केले जात असत.

**अठराव्या शतकात मराठा सरदारांवर प्रशासनाच्या सहजतेसाठी जहागीर सोपविण्यात आली. या जहागीरीच्या संपूर्ण विस्तारापैकी व्यावसायिकरित्या महत्व असलेल्या नगरांमध्ये प्रगतीशील विकासाला प्राधान्य देण्यात आले. अशा नगरांचे काही उदाहरणे खालील प्रमाणे दिसून आले –**

| जहागीरीचा प्रांत | प्रांतामधील नगरे | विकसित नगरे |
|---|---|---|
| वाई परगणा | वाई, बावधन, रहिमतुर | वाई |
| सुपे परगणा | सुपे, सासवड, बारामती | बारामती |
| रोहीड खोरे | भोर, उत्रोली | भोर |
| चाकण परगणा | चाकण, इंदुरी, सुदुंबरे | – |


**अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील सुधारणा :**


अनेक कसबा गावांचे नगरात परिवर्तन झाले, तर नगरांचे शहरात रूपांतर करण्यात आले. व्यवसायाच्या बरोबरीने वसाहतींच्या संख्येतही वाढ होताना दिसत असल्यामुळे नगरांचा विस्तार मोठा होत गेला, आणि त्याच बरोबर नागरिकांच्या जीवनशैलीतही सुधार होताना दिसले. पुणे आणि सातारा सारख्या विकसनशील शहरांमध्ये वाढती लोकसंख्या पाहता नवीन बाजारपेठा व वसाहती स्थापित करण्याची गरज दिसून आली.

या सुधारणा आणि परिवर्तन समजून घेण्यासाठी विविध्यपूर्ण उदाहरणे पाहिले जाऊ शकतात -

- कसबा सासवड - छोटं कसबा गाव ते छोटं कसबा नगर
- कसबा वाई - कसबा गाव ते निवासी नगर
- कसबा पुणे - कसबा गाव ते शहर


**<u>कसबा सासवड - छोटं कसबा गाव ते छोटं कसबा नगर :</u>**








डॉ. पराग गोवर्धन नारखेडे शर्वरी देशपांडे 


- कसबा सासवडच्या नदीकाठांवर स्थित संत सोपानदेव यांच्या समाधीमुळे सासवडला ऐतिहासिक महत्व आहे.
- पुरंदरे वाड्याभोवती वसाहतींमध्ये वाढ होत गेली आणि पेठ बहिरवपुराच्या परिसरातील नागरी वस्त्यांच्या प्रगतीशील विकास होत राहिला.




**कसबा वाई - कसबा गाव ते निवासी नगर :**



कसबा वाई या नगराला पाच भागांमध्ये विभाजित करण्यात आले - वाई, ब्राह्मणशाही, गणपती आळी, मधली आळी आणि गाणगापुरी.





**<u>कसबा पुणे - कसबा गाव ते शहर :</u>**

- सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस पुणे हे नगर कसबा गाव म्हणून ओळखले जात असत, व्यावसायिक आणि व्यापारविषयक प्रगतीमुळे हे नगर समृद्ध होत गेले.
- संरेखित रस्त्यांचे नियोजन व स्वच्छताविषयक सहाय्यक रस्त्यांची व्यवस्था केल्यामुळे पुणे शहर हे समकालीन नगरांसाठी उदाहरण म्हणून बघितले जय लागले.
- जुन्या पेठांना नवीन पेठांशी जोडण्याकरता केलेल्या विस्तार कार्यांचे नियोजन अत्यंत दक्षतेने घडवून आणले गेले.
- अनेक नवीन पेठ स्थापित झाल्या, ज्यांच्यामुळे शहराच्या पूर्व स्थापनेचा बिंदू विस्ताराच्या क्षेत्राशी जोडला गेला.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 3


Pune in A.D. 1740

पुणे (सन १७४०)





Pune in A.D. 1761

पुणे (सन १७६१)






| | | | |
|---|---|---|---|
| १. कसबा क्षेत्र | ७. शनिवारवाडा | १३. पेठ मीठगंज | १९. मुझफरजंग पेठ |
| २. पेठ सोमवार | ८. पेठ शुक्रवार | १४. (रास्ता) पेठ शिवपुरी | २०. नारायण पेठ |
| ३. पेठ मंगळवार | ९. पंचमुखी मारुती मंदिर | १५. लकडी पूल | २१. घोरपडे पेठ |
| ४. पेठ शनिवार | १०. गुरुवार पेठ | १६. नागेश पेठ | २२. पेठ नवापूर |
| ५. पेठ बुधवार | ११. पर्वती तलाव व सारसबाग | १७. भवानी पेठ | २३. (नाना) पेठ हनुमंत |
| ६. पेठ रविवार | १२. पेठ गणेश | १८. सदाशिव पेठ | २४. पेठ नरसिंहपूर |

पुणे (सन १७७२)





शहर पुणे (सन १८०५)







- परिवर्तन व विकास कार्याचा पहिला टप्पा : १७३२ ते १७४५
- परिवर्तन व विकास कार्याचा दुसरा टप्पा : १७४५ ते १७६१
- परिवर्तन व विकास कार्याचा तिसरा टप्पा : १७६१ ते १७९५





**पुण्यातील पेठांच्या स्थापना**

● बाजारपेठ ● निवासी व व्यापारी ● व्यायसायिक व व्यापारी ● निवासी ● व्यापारी



Map showing riverbank of Narayan Peth, Pune

पुण्यातील नदीकाठावर स्थित नारायण पेठेचा नकाशा



Map showing riverbank of Kasba Wai

कसबा वाईमधील नदीकाठावरील क्षेत्राचा नकाशा

**कसबा पुणे (शनिवार व नारायण पेठ) आणि कसबा वाई (ब्राह्मणशाही, गणपती आळी व मधली आळी) यांच्यातील नियोजनाचे समान वैशिष्ट्ये :**

- नदीकाठाच्या वक्ररेषांना समांतर असतील अश्या रस्त्यांचे नियोजन दोन्ही नगरांमध्ये दिसून आले.
- सहाय्यक रस्ते संरेखित प्रकारे मुख्य रस्त्याला जुळतील अशा पद्धतीने योजिले गेले (उदा : पुण्यातील भवानी पेठ व गणेश पेठ).
- संरेखित रस्त्यांची संकल्पना व्यापारी पेठांमध्येच नव्हे तर निवासी पेठांमध्ये सुद्धा वापरण्यात आली (उदा : वाई कसब्यातील पेठ धर्मापुरी).
- पूर्वस्थापित पेठांना विचारात घेऊनच नवीन पेठा व रस्त्यांचे नियोजन पूर्ण विस्ताराला एकत्रित जोडण्यात येईल असे केले गेले.
- परिपूर्ण संरेखित योजना विचारात घेऊन शिवपुरी पेठ (रास्ते पेठ) स्थापित करण्यात आली, आणि त्याचा पाठोपाठ समान तर्कांवर वाईमधील पेठ गंगापूरी स्थापित झाली.

**निष्कर्ष :**

मराठा नगर नियोजनाचा संशोधनात्मक अभ्यास नियोजन व्यव्स्थेचे विविध तर्क समजून घेण्यास उपयुक्त ठरतो. इतिहासातील परिस्थितीला लक्षात घेता पुणे व समकालीन नगरांची उत्क्रांती कशी होत गेली याचे अध्ययन या संशोधनाने शक्य होते. नगरांच्या पूर्ववर्ती विस्तारासाठी घडवून आणलेल्या प्रगतीशील पद्धती आकलन करण्यास सहाय्य होते. संघटनात्मक व असंघटनात्मक अशा दोन्ही प्रकारे विकसित झालेल्या नगरांचा आढावा नकाशातून समजून घेतला आहे. या रीतीने अभ्यासात मांडलेल्या स्पष्टीकरणांमधून दिसून येते की मराठा नगरे पहिल्या दृष्टीक्षेपात विस्ताराच्या योजनांबाबत जरी असंघटित व विखुरलेल्या स्थितीत आढळतात, तरी त्या गावांमधील

अरुंद व नागमोडी रस्ते, तटबंधी व कोट बांधकाम, मुख्य रस्त्यापासून विरुद्ध दिशेस असलेले प्रवेशद्वार ही सगळी साधने नागरिकांच्या दक्षतेची चिन्हं आहेत असे कळून येते. या सर्व सुरक्षिततेच्या दृष्टीने असलेल्या पायाभूत सुविधांमुळे आणि स्थानिकांच्या व प्रशासकांच्या पुरोगामी विचारांमुळे ही नगरे दीर्घायुष्यीत राहिली. या नगरांचा विकासाकडे बघण्याचा परिवर्तनशील दृष्टिकोन हा एक अत्यंत महत्वाचा गुणधर्म मानला जाऊ शकतो,ज्यामुळे ही नगरे काळानुसार होणारे बदल आत्मसात करून घेण्यायोग्य ठरली. म्हणूनच या नगरांच्या नियोजन पद्धतींचे पुनरावलोकन सद्यपरिस्थितीतील प्रश्नांना उत्तरे देण्यास मदत करते, आणि त्याच बरोबरीने अशा थेट उदाहरणांमुळे भविष्यातील नगर नियोजनाचे नियम कायम करण्यास सहाय्य होते.

## संदर्भ :


- सोवानी, अविनाश व भट, श्रीपाद (२०११) १७व्या व १८व्या शतकातील गावाच्या विकासपद्धतींच्या संदर्भाने 'मराठा नगर नियोजन', श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीय अभ्यासाचे केंद्र, पुणे, भारत : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
- https://en.wikipedia.org/wiki/List_of_Indian_Monarchs#Maratha_Empire_(1674%E2%80%931818)